**विशेष दिवाणी दावा क्र १८७/२०२३**
**रघुनाथ वि अर्जुन**
**निशाणी क्र ३२**

**<u>वादीचा शपथेवर उलटतपास सुरु प्रतिवादीतर्फे वकील, श्री के आर शेख</u>**

१. वादमिळकतीचा गट क्रमांक ३७० आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१६ मध्ये वादमिळकत मी विक्रीसाठी काढली होती. रामचंद्र माझा भाऊ आहे. मला व रामचंद्रला आर्थिक गरज असल्याने वादमिळकत विक्रीसाठी काढली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र १ सोबत माझी व रामचंद्रची वादमिळकत विक्रीसंबंधी बोलणी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, बोलणी होवून वादमिळकतीची किंमत रुपये १९,२०,०००/- ठरली होती. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१६ साली वादमिळकत नवीन शर्तीची असल्याने विक्रीकरीता शासकीय परवानगीची गरज होती. हे म्हणणे खरे नाही की, मी व रामचंद्रने मिळून प्रतिवादी क्र १ ला वादमिळकतीचे साठेखत करुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, मी व रामचंद्रने प्रतिवादी क्र १ च्या नावे कुलमुखत्यारपत्र करुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, साठेखत आणि कुलमुखत्यार संबंधी मी दुय्यम उप-निबंधक कार्यालय, माढा येथे तक्रार केली नाही.

प्रश्न - तुम्ही दिलेल्या कुलमुखत्यारपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र १ ने खरेदीखत करुन घेतले?

उत्तर - त्याने आम्हाला दारु पाजवून काय केले मला काही माहिती नाही.

हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने आम्हाला पाजवून काही समजू दिले नाही असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, स्वःमर्जीने प्रतिवादी क्र १ च्या नावे साठेखत आणि कुलमुखत्यारपत्र करुन दिले आहे. साठेखत आणि कुलमुखत्यारपत्रासंबंधी मी पोलीस ठाण्यात तक्रार केलेली नाही. करकंब आणि तुळशी गावांदरम्यान शिव आहे. करकंब गावातून तुळशी गावाकडे जाण्याकरीता जवळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, जमीन खरेदीनंतर प्रतिवादी क्र १ ने वादमिळकतीमध्ये तूरीचे पीक केले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र १ ने लावलेले तूरीचे पीक प्रतिवादी क्र १ ने काढून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत तारखेपासून वादमिळकतीमध्ये प्रतिवादी क्र १ ची वहिवाट आहे.

२. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकती संदर्भातील मृत्युपत्राबाबत माझे व अभिमान शंकर चव्हाण दरम्यान वाद सुरु आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी आणि दारुसंबंधी मी जे काही माझ्या लेखी म्हणण्यामध्ये आणि सरतपासात लिहिले आहे ते चुकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वाचून दाखवले बरोबर आहे,

JAIN AKHIL OMPRAKASH

Digitally signed by JAIN AKHIL OMPRAKASH
Date: 2025.02.27 15:43:58 +0530

(अखिल जैन)

दिनांक - २७/०२/२०२५.

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.